# पंचशील अपार्टमेंट हया अतिधोकादायक इमारतीचे निष्कासन




उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. २ च्या कार्यक्षेत्रात काशामल पुतळयाजवळ तळमजला+ ४ मजले अशा स्वरुपाची पंचशील अपार्टमेंट नावाची इमारत आहे. सदर इमारतीचे बांधकाम सुमारे २० वर्षांपूर्वी करण्यात आलेले आहे. तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरची इमारत अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. सदरची इमारत अतिधोकादायक असल्याने महापालिकेतर्फे सदर इमारत पूर्णपणे रिकामी करुन घेण्यात आलेली होती. सदर इमारत ही मुख्य रस्त्यालगत असून आजुबाजूला रहिवासी वापर असल्याने पावसाच्या कालावधीत इमारत केव्हाही कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याची दाट शक्यता होती. यासाठी सदर इमारतीचे दिनांक ६/७/२०१५ पासून अत्याधुनिक यंत्रसामुग्रीद्वारे निष्कासन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदरची इमारत पूर्णपणे निष्कासीत करण्यात येणार आहे.